डॉ० राम मनोहर लोहिया के विचारों की सार्थकता: एक समसामयिक मूल्यांकन

1153-1156 डॉ0 ऋचा

PDF

बाबा बंदा बहादुर बैरागी की प्रशासनिक व्यवस्था एवं नीतियों का विश्लेषणात्मक अध्ययन

1157-1162 राकेश कुमार

PDF

आयुर्विज्ञान का उद्भव और विकास

1163-1171 डॉ. कुमकुम पाठक

PDF

गांधीजींचे शैक्षणिक विचार व प्रासंगिकता

1172-1181 डॉ. किरण सावे

PDF

Drishtikon
(UGC Care Journal)

ISSN 0975-119X
Vol-11-Issue-06
November-December-2019

# गांधीजींचे शैक्षणिक विचार व प्रासंगिकता

**प्राचार्य डॉ. किरण सावे**
asthakiran@gmail.com
**सोनोपंत दांडेकर कला, व्ही. एस. आपटे वाणिज्य आणि एम. एच. मेहता विज्ञान महाविद्यालय, पालघर**

राष्ट्रपिता म. गांधी ही केवळ व्यक्ती नसून तो एक विचार आहे. अनेक सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय संकल्पनांना स्वानुभावाने सत्यात उतरविणारा विचार म्हणजेच गांधीजी असे म्हटल्यास ते जराही विसंगत ठरणार नाही.

गांधीजी शरीररूपाने अस्तित्वात नाहीत मात्र विचाराने व त्यांच्या वैचारिक प्रभावातून निर्माण झालेल्या विविध रूपातून ते आजही अस्तित्वात आहेत. गांधीजी ही एक विचारधारा आहे कधीच न संपणारी, मानवी कल्याणासाठी जीवनाच्या सर्व अगांना भिडून अत्युच्य व अमुल्य रूप देणारा गांधी विचार राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर व समाजाच्या देशाच्या कानाकोपऱ्यात पसरला आहे व तेवढ्याच ताकदीने तो उभा आहे.

गांधीजींनी भारतीय लोकांमध्ये वैचारिक मुल्य पेरण्याचा प्रयत्न स्वत:च्या वर्तणूकीतून केला आहे. धर्म संस्कृती,राजकारण, अर्थकारण यांचा मेळ घालतांना रामराज्याची संकल्पना मांडून सत्य - न्याय व नितिच्या विचार व्यवहाराची व्यापकता व स्विकारार्हता वाढविली आहे.

सत्य - क्षमा - अहिंसा या तत्वांचा अंगिकार करून मानवाला अत्युच्य पद व मानवी जीवनाची परिपूर्णता, सफलता मिळविता येते हे गांधीजींनी आपल्या विचार व व्यवहारातून दाखविले आहे. मानवी जीवनाला उच्च पद मिळवून देणे मानवी जीवनाची परिपूर्णता साधण्यासाठी धर्म आवश्यक आहे व हा धर्म माणसाच्या व्यवहारात प्रस्थापित करण्यासाठी संस्कार संस्कृती व शिक्षण याची नितांत आवश्यकता आहे असे त्यांनी प्रतिपादन केले आहे.

मानवी जीवनाच्या परिपूर्ततेसाठी सत्य - न्याय व नीती ही तत्वप्रणाली आवश्यक असून भौतिकवाद, सता व स्वार्थ यामुळे या तत्वांचा ऱ्हास होतो. त्यामूळे नीतीमुल्याधारित शिक्षण, काम करत करत शिक्षण सहज शिक्षण,असे

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-11-Issue-06
November-December-2019

विविध शिक्षणासाठीचे विचार प्रयोग रूपाने त्यांनी मांडले व त्या विचारांना मुर्त रूप देण्यासाठी ''नयी तालिम'' सारखे शैक्षणिक प्रयोग व्यापक रूपात देशासमोर ठेवले.

## गांधीजींचा शैक्षणिक दृष्टिकोन:

वर्ग, शोषण व भेदविहीन समाजाची लोकशाही समाजव्यवस्था निर्माण करणे हे गांधीजींच्या विचाराचे व वैयक्तिक आचरणाचे सुत्र होते. शिक्षणाच्या सार्वत्रिकरणातून समाजात प्रस्थापित झालेली उच्चनिच्चता, धर्मभेद, जातीभेद, भाषाभेद, प्रांतीयभेद, वर्णभेद मिटविणे हे त्यांच्या विचारांचे व त्यासाठी नयी तालिम च्या रूपाने सुरू केलेल्या शैक्षणिक उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट होते. स्वातंत्रपूर्व काळात तथापि भारतात येण्यापूर्वीच आफ्रिकेत असतांना त्यांनी ''टालस्टॉय फार्म'' मधील कार्यकर्त्यांच्या मुलांसाठी शिक्षणाचे विविध उपक्रम सुरू केले होते. प्राथमिक स्तरापासून शिक्षण ग्रहण क्षमतेसाठी सहजता व सरलता ही तत्वे त्यांनी त्याची उपयोगिता दिसून आल्याने स्वीकारली होती.

गांधीजींच्या शिक्षण विचारांचे तत्व त्यांच्या वैयक्तिक जीवनक्रमातून साकारले गेले होते. बालपणी गांधीजी त्यांच्या आई वडीलांमुळे व त्यांच्यातील पारंपारीक विचार व आचरणामुळे धार्मिक होतेच मुळात त्यांचे कुटूंब धार्मिक, सहिष्णू व सेवाभावी असल्यामुळे हे सारे गुण त्यांना साहजिकच कौटुंबिक संस्कारातून मिळाले होते. बालपणी त्यांच्यावर झालेले धार्मिक कौटुंबिक संस्कार त्यांच्यातील सत्यनिष्ठेला अधिष्ठान मिळवून देतात आणि ही सत्यनिष्ठेची आचरणशीलता केवळ पुस्तकी ज्ञानातून मिळत नाही. त्यासाठी कुटुंब, भाषा, संस्कृती, धर्मविचार व योग्य सहजीवनाव्दारे ती येत असते. आणि नेमकी ही तत्वे मेकॅलेच्या शिक्षणाच्या आकृती बंधात नव्हती. मेकॅलेची शिक्षण पध्दती गांधीजींच्या विचारांच्या पूर्णपणे विरोधाभासी आहे. पुस्तकी शिक्षणाने केवळ साक्षरता निर्माण होईल व अशा साक्षरांच्या व्दारेच समाज व राष्ट उभे करता येणार नाही त्यासाठी संवेदनशील, सत्यनिष्ठ, नैतिक समाज निर्माण करण्यासाठी नैतिक शिक्षणाचा अवलंब, प्रचार व प्रसार अत्यंत आवश्यक आहे ही त्यांची धारणा होती.

त्यांच्यावर झालेल्या धार्मिक, कौटुंबिक संस्कारामुळे आत्मचिंतनशीलता, प्रामाणिकपणा, प्रयोगशीलता व सहिष्णूता या वैचारिक प्रवृत्तीची वाढ झाली व

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-11-Issue-06
November-December-2019

त्यामुळेच पुढील आयुष्यात त्यांच्या शिक्षणविषयक विचारांना नीती, अनुभव व सत्यनिष्ठेमुळे एक वेगळेच वैचारिक अधिष्ठान प्राप्त झाले. दक्षिण आफ्रिकेतील वास्तव्यात ज्या पध्दतीने त्यांना स्वतः रंगभेदाचा सामना करावा लागला त्यातनूच त्यांच्या मनात संवेदनशीलता व सहिष्णूता निर्माण झाली. जागतिक स्तरावर विविध देशात चालणारी गृहयुद्ध, आपआपसातील जातीय व वर्णसंघर्ष, समृध्द राष्ट्राकडून गरीब देशाची त्यांच्या संसाधनाची होणारी लुट, मानवी तस्करी, गुलामगिरी, वेठबिगारी, जातीय धार्मिक व वर्णभेदातून होणाऱ्या हिंसा, संघटित स्वरूपात होणारे असंघटित जनसमुदायाचे शोषण या सर्व घटनांचा गांधीजींच्या मनावर परिणाम होत होता आणि त्यातूनच त्यांच्या शिक्षणविषयक विचारांना जीवनानुभवांच्या व्दारे आकार येत होता. गांधीजींच्या व्यक्तीमत्वावर अनेक घटकांचा प्रभाव दिसून येतो. विदेशात असतांना विद्यार्थी दशेपासूनच टॉलस्टॉय, ट्रमर्सन, रस्किन या पाश्चात्य विचारवंतांचा प्रभाव होता.

ट्रमर्सन व रस्किन यांच्या विचाराने आंतरंगांना वेगळीच उभारी दिसली व त्यांचे विचार अधिकच स्पष्ट व प्रगल्भ झाले.

मानवी उत्क्रांतीचे मुल्यमापन करायचे असेल तर केवळ त्यांच्या शारिरीक व भौतिक गुणांचे समीक्षण करून भागणार नाही तर उत्क्रांतीच्या विविध टप्प्यावर समाजातील दुर्बल व शेवटच्या घटकाला जगणे व सर्वच दृष्टिने कसे उत्क्रांत व विकसित होता आले हे बघावे लागेल आणि हाच गांधीजींच्या विचारांचा मध्यबिंदू होता.

प्रत्येकाचे स्वातंत्र्य, न्याय व सन्मान निश्चित करण्यासाठी शिक्षण प्रक्रियेतच नैतिक शिक्षणाला अधिष्ठान दिले जावे असा त्यांचा आग्रह होता.मानवी जीवनशैली नैसर्गिकता व नैतिकतेने जीवन जगण्यासाठीची विकसित शैक्षणिक प्रणाली उभारण्यासाठी शिक्षण क्षेत्रासांठी नयी तालीम सारखे शैक्षणिक प्रयोग व्यापक स्वरूपात राबवायला त्यांनी सांगितले, त्यांचे सकारात्मक परिणाम निश्चितच झाले आहेत व त्या व्दारे आमुलाग्र बदल व्हायला बऱ्याच प्रमाणात मदत झाली आहे.

भारतीय समाजाचा विकास व उन्नयन शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणातूनच होवू शकेल त्यासाठी महिलांच्या शिक्षणाला व्यापकतेने स्विकारले जावे असा त्यांचा आग्रह होता. शिक्षण सक्तीचे असले तरी ते मुलांना सक्तीचे न वाटता मातृभाषेतुन

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-11-Issue-06
November-December-2019

व सहजपणे त्यांचा कल आवड व ग्राहकता लक्षात घेवूनच ते द्यावे असा त्यांचा विचार होता.

आफ्रिकेत असतांना त्यांनी त्यांच्या सहवासातील लोकांच्या मुलांना स्थानिक शिक्षण न देता त्या आकृतीबंधाच्या पलीकडे जावून नैतिकता, सत्याग्रह व आरोग्याचे शिक्षण देण्याचा प्रयत्न केला शिक्षण प्रक्रिया हि सहज असावी व मुलांना शिक्षण देतांना मातृभाषेचा वापर करावा यासाठी ते नेहमी आग्रही भूमिका घेत. शिक्षण घेतांना मुलांना दडपण न वाटता ते आनंददायी वाटले पाहिजे तरच शिक्षणाबद्दलची विद्यार्थ्याची गुणग्राहकता वाढून शिक्षणाचा व्यापक प्रभाव पडेल. पर्यायाने मानवी समाजाला ते उपयोगी पडेल.

शिक्षण प्रक्रिया हि कोणत्याही स्तरावर असो त्या प्रक्रियेत गांधीजींच्या शिक्षण विचारात विद्यार्थ्यासांठी एकादशव्रतांचे पालन हा महत्वाचा भाग होता त्यामूळे विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्व व जीवनात नैतिकतेचे अधिष्ठान प्राप्त होते अशी त्यांची धारणा होती त्यामध्ये अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य, असंग्रह, शरीरश्रम, अस्वाद, निर्भयता, सर्वधर्मसमभाव, स्वदेशी व अस्पृश्यता निर्मूलन ही वृत्ते होती. गांधीजींच्या सर्व आश्रमात ही तत्वे कटाक्षाने पाळली जात. याशिवाय त्यांचे विद्यार्थी व अनुयायी व सत्याग्रहीसांठी देखील श्रमाधारीत व उद्योगाधारीत शिक्षणाचे तत्व आंगिकारले जाई.

शिक्षणाची उदिष्टे ठरविताना, व्यावहारीकता, व उपयोगिता तसेच ग्रामस्वराज्य व स्वावलंबन या गोष्टी नेहमी केंद्रस्थानी ठेवूनच शिक्षण प्रधानता ठरविली पाहीजे यासाठी ते आग्रही होते. केवळ अक्षर साक्षरता निर्माण करून समाजाचे मुल्यधारण होणार नाही तर आदर्श जीवन जगण्यासाठी आवश्यक आसलेली नैतिकता व सन्मानपूर्वक जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेली व्यावहारीक, व्यावसायिक कुशलता व त्यासोबतच त्यातून निर्माण होणारे व्यक्तिगत व राष्टीय चारित्र्य निर्माण करणे हाच शैक्षणिक विकासाचा परमोच्च बिंदू आहे असे त्यांचे ठाम मत होते.

जीवनात नैतिकबळ व व्यवहार ज्ञान असणाऱ्या व्यक्तिलाही समाजात प्रतिष्ठा मिळाली पाहीजे केवळ पुस्तकी ज्ञान असणाऱ्या व्यक्तिला नव्हे हा त्यांचा विचार होता. त्यामूळे शिक्षणाला श्रम व नैतिकतेची जोड असलीच पाहीजे. किंबहूना

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-11-Issue-06
November-December-2019

प्रत्यक्ष कार्यानुभव अधिक परिणाम कारक होवून चांगला ज्ञानसंग्रह होवू शकेल असे त्यांना वाटत असे.

शास्त्रीय दृष्टिकोण बाळगणे व्यावसायिक कौशल्याधारित शिक्षणातून विद्यार्थ्याला मुल्याधारित शिक्षणाची जोड देवून सर्व आवश्यक शास्त्रे शिकविता येतात हे त्यांनी दाखवून दिले गणित, भाषा, भुगोल, कृषी ही शास्त्रे देखील खेळ, शिक्षण व जीवन यांची गुंफण करून विद्यार्थ्यी सहजपणे शिकू शकेल.अशी त्यांची धारणा होती.

गांधीजींच्या विचारातील शैक्षणिक आकृतीबंध खऱ्या अर्थाने १९३७ साली वर्ध्यात झालेल्या शिक्षण परिषदेत मांडला. या परिषदेला देशभरातील ९० प्रतिनिधी उपस्थित होते त्यांच्या संकल्पनेतील शिक्षणाचे नवे स्वरूप नवी तालीम च्या रूपाने स्पष्ट करण्यात आले. या परिषदेत सर्व प्रतिनिधींसमोर ग्रामस्वराज्य, ग्रामराज्य, ग्रामसुराज्य व नैतिक, व्यावसायिक व अत्यंत व्यावहारीक अशी नवी संकल्पना अधिक विस्तृत स्वरूपात मांडली. 'बुनियादी शिक्षण' हे प्रत्येक मुलाला मिळालेच पाहीज व ह्या शिक्षणात गरीबी श्रीमंती हा भेदभाव मिटविण्याचे सामर्थ्य असावे तसेच प्रत्येकाला जीवननिर्वाहाची शाश्वती आणि स्वातंत्र्यांची हमी मिळालीच पाहीजे.

## बुनियादी शिक्षणाची तीन महत्वाची अंगे होती.

- स्वच्छ व निरोगी राहण्याचे शिक्षण
- स्वावलंबनासाठीचा अभ्यास
- मातृभाषेतून शिक्षण

या प्रकारच्या शिक्षणाच्या संकल्पनेत गणित, भुगोल, समाजविज्ञान, विज्ञान, सामाजिक नागरीकता, चित्रकला, संगीत, व सांस्कृतीक तसेच नैतिक शिक्षणाचा समावेश होता.

थोडक्यात ज्ञान व कर्म यांची जोड घालून सामाजिक मुल्यांमध्ये क्रांति करून मुलांना अहिंसा, स्वातंत्र्य, सहकार व त्याव्दारे भयमुक्त समाज निर्माण करणे, आध्यात्मिक विकास साधुन सर्वांप्रती आदरभाव सहिष्णूभाव वाढविणे निसर्ग व शेतीशी नाते जोडून मुलांमध्ये अनुशासन व चारित्र्याची निमिर्ती करणे ही गांधीजींची संकल्पना सर्वच स्तरावरच्या शैक्षणिक घटकांसाठी महत्वपूर्ण आहे

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-11-Issue-06
November-December-2019

तसेच ही संकत्पना जीवनाचे तत्वज्ञान आहे, अर्थपूर्ण जगण्याची कला आहे असे नारायणभाई देसाईनी एकदा म्हटले होते.
गांधीजींच्या शिक्षणविचारांचा गाभा म्हणजे सत्य, अहिंसा, सहिष्णूता, साधन शुध्दी, निसर्गाची हानी न करता मानवी जीवनाची प्रत्येकाला सार्थकता जपण्याची संधी मिळवून देणे आर्थिक, सामाजिक समता निर्माण करणे हा होय.

## गांधीजींच्या शैक्षणिक विचारांची प्रासंगिकता

गंधीजींची 'नयी तालीम किंवा बुनियादी शिक्षा' ही संकल्पना व त्यांचे प्रयोग म्हणजे ज्ञान व काम यांचा सुंदर संगम होय व त्यातूनच बुध्दीचा विकास होतो. यावा त्यांचा विश्वास होता त्यामूळे विद्यार्थ्यांचा बुध्दीविकास व ज्ञानप्राप्तीची भूक भागविण्यासाठी हा प्रयोग खुप उपयुक्त ठरला आहे. ही शिक्षण प्रणाली पूर्णपणे नैसर्गिक आहे. यामध्ये ज्ञानप्राप्तीचा विशिष्ठ मापदंड नसतो विशिष्ठ पुस्तक किंवा साचेबध्द आभ्यासक्रम नसतो. ज्ञानाची लालसा निर्माण होते व त्यातूनच कामाची यशस्वीता होते. त्यातूनच व्यक्ती व समाज विकास घडतो केवळ पुस्तके वाचून वा पदव्या मिळवून हे ध्येय साधता येवू शकत नाही या पद्धतीमध्ये सामाजिक स्वरूपाच्या कामाला व त्याव्दारे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष शिक्षण घेण्याला महत्व असल्यामुळे अंधानुकरणाऐवजी कल्पकतेला व सृजनशीलतेला महत्वाचे स्थान या पद्धतीत आहे. गांधीजींचा शिक्षण आकृतीबंध पुस्तके, वर्ग, तासिका, पोपटपंची, परीक्षा याहून पूर्णपणे वेगळा आहे ते सुर्वार्थाने नैसर्गिक व अनुभवातील ज्ञानग्रहण असल्यामुळे ते चिरकाल टिकणारे आहे.

## गांधीजींच्या नयी तालीमच्या प्रयोगाचे अनुभव क्षेत्र शेती :

विद्यार्थीदशेतच विद्यार्थ्यांना शेती व शेती संबंधित कामे केवळ माहीती असून चालणार नाही तर त्यामध्ये त्यांची आवड वाढून शेतात राबून ज्ञान वाढविण्याची आवड निर्माण होणे ही उद्दष्टे आहे आज जागतिकीकरणाच्या जगात आधुनिकतेतून निर्माण होणाऱ्या भौतिकवादाच्या मोहजालात अडकलेल्या युवकांना शेती काम नकोसे झाले आहे शारिरीक कष्टाची कामे नकोशी होत आहेत.

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-11-Issue-06
November-December-2019

'मी साऱ्या जगाला पोसतो' ही आत्मिक शुध्द अध्यात्मिक भावना गळून पडत चालली आहे. त्यामूळे गांधीजींचे शेती व ग्रामिण शिक्षण विकासाचे विचार आजही प्रासंगिक आहेत, आवश्यक आहेत.

**व्यावसायिक कौशल्य :**

उत्पादक कामातून शिक्षण हे गांधी विचारांचे शिक्षण सूत्र होते. प्रत्येकांकडे काहीना काही प्राचीन भारतीय सामाजिक उद्यमशीलतेप्रमाणे व्यावसायिक कौशल्ये असावयास हवे ही त्यांची रास्त अपेक्षा होती मात्र आजचे शिक्षण मेकॅलेच्या सूत्रावर प्रस्थापित असल्यामुळे पदवीधरांची म्हणजेच अकुशल लोकांची फौज तयार होत आहे, जे गांधीजींना कदापी मान्य नव्हते त्यामूळे सध्याच्या बेरोजगारीला दूर करण्यासाठी गांधीजींचे स्वावलंबी व्यावसायिक शिक्षण विचार आजही तितकेच सुसंगत ठरतात.

**नैसर्गिक जाणिवा :**

शेतीत राबतांना व संचार करतांना प्रत्यक्षपणे आपण शिकतो त्यामूळे निसर्गाप्रतीची उत्कट भावना निर्माण होवून पर्यावरण रक्षण व प्राणी संरक्षण ही मुल्ये आपोआप स्विकारली जातात. भांडवलवाद व कारखानदारीमुळे नैसर्गिक साधन संपत्तीची वारेमाप लूट सुरू असतांना गांधीजींची निसर्ग शिक्षणाची गरज आजही किती आवश्यक आहे याची प्रचिती येते.

**नैतिक व मुल्यशिक्षण :**

भारतीय समाजात विविध जुन्या चालीरीती अत्यंत वाईट प्रथा परंपरा अद्याप अस्तित्वात आहेत त्या नष्ट करण्यासाठी नैतिकतेचे अधिष्ठान शिक्षणाच्या प्राथमिकस्तरावरूनच आले पाहीजे असा त्यांचा आग्रह होता.

**स्त्री पुरूष समानता :**

महिला वर्गाच्या उन्नतीशिवाय कोणताच देश एकराष्ट्र म्हणून उभे राहू शकत नाही ही त्यांची धारणा होती. त्यामूळे स्त्री पुरुष समानतेचे धडे अगदी स्वयंपाक घरातून कृतीव्दारे दिले जावू शकतात असे त्यांचे म्हणने होते. शालेय जीवनापासूनच स्त्री पुरूष समानतेची तत्व एक मुल्य म्हणून रूजविणे आजही

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-11-Issue-06
November-December-2019

किती आवश्यक आहे हे स्त्रीयांवरील होणाऱ्या अत्याचारांच्या देशभरातील विविध घटनामधून लक्षात येते. महिलासंबंधी दृष्टिकोन व विचार बदलण्यासाठी सामुदायिक शिक्षण व मिश्र गटातील एकजीनसीपणा साधून हे उद्दिष्ट साध्य करता येईल.

## अस्पृश्यांप्रतीची संवेदना :

वर्णव्यवस्थेच्या संस्कारातूनच जातीउद्भव झाला व त्याचा परिणाम जाती आधारीत उच्च निचता व त्यातुन निर्माण होणाऱ्या शोषणात झाला. गांधीजींनी वर्ण कर्मावर आधारीत व वर्णव्यवस्थेचे समर्थन करीत मात्र जन्मावर आधारीत व त्यातून अत्यंत आईट अशा अस्पृश्यता व जातीभेदाला त्यांचा प्रचंड विरोध होता. अस्पृश्यांना त्यांचे मुलभूत हक्क आहेत व अस्पृश्यता पाळणे हा हिंदू धर्मावरील कलंक आहे असे त्यांनी म्हटले आहे. मात्र आजही देशात अस्पृश्यांवर अत्याचार होतच असतात.

कायदे करूनही त्यांची म्हणावी तेवढी परिणामकारकता अजूनही साधता आलेली नाही त्यामूळे उच्च जातीय मानसिकतेत बदल घडविण्यासाठी गांधीजींचे अस्पृश्यता निवारणाचे
विचार शैक्षणिक कार्यात स्विकारणे काळाची गरज बनली आहे.

## सहिष्णूता, बंधुता :

शिक्षण घेतांना सर्व विद्यार्थी एकत्र येवून ज्ञान ग्रहण करतात या स्तरापासून त्यांना सहिष्णूता व बंधुतेचे तत्व त्यांच्या मनात रूजविले गेले पाहीजे ही त्यांची भूमिका होती.

परस्पर संस्कृती व धर्माचा आदर केल्यानेच सहिष्णूता वाढते व एकमेंकांप्रती आदरभाव वाढून बंधुभाव वाढीस लागतो. भारतीय लोकशाही अधिकाधिक प्रगल्भ होत असतांना जातीय व धार्मिक तंटे वाढत आहे. धार्मिक विद्वेष व धार्मिक कट्टरता वाढीस लागली आहे, हिंदू - मुस्लिम यांच्यातील वैमनष्य वाढत आहे याला कारणीभूत अनेक कारणे असली तरी धर्मनिरपेक्ष असलेल्या देशाला हा संघर्ष मुळीच परवडणारा नाही. अल्पसंख्यांकाच्या जीवाची हमी संविधानाने व त्याही अगोदर गांधीजींनी दिल्यामुळे गांधीजींच्या सहिष्णूतेच्या तत्वाची पेरणी किशोरावस्थेपासूनच शिक्षणातून करणे काळाची गरज बनली आहे.

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-11-Issue-06
November-December-2019

## ग्रामविकास :

खरा भारत ग्रामिण भागात आहे गावात आहे त्यामूळे ग्रामिण रचना तसेच ग्रामिण अर्थव्यवस्था टिकली पाहीजे तोच भारताला स्वावलंबी बनविते त्यामूळे ग्रामिण अर्थव्यवस्थेला हादरा देणारी धोरणे अजिबात अवलंबू नयेत मात्र वाढत्या औद्योगिकीकरणामूळे Liberation Privatization व Globalization मुळे ग्रामिण अर्थव्यवस्थेला खूप मोठे तडे जात आहेत. ग्रामिण भागातून शहराकडे स्थलांतर होत आहे. त्यामूळे शहरीकरणाची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. गावातल्या गावातच रोजगार या संकल्पनेतून ग्रामिण अर्थव्यवस्था सांभाळली ती शहरे बकाल होणार नाहीत, यासाठी शेतीचे आधुनिक शिक्षण, शेती आधुनिक व्यवसायाचे शिक्षण व इतर व्यावसायिक स्वावलंबी शिक्षणानेच ग्रामिण भारत टिकणार आहे हा गांधीजींनी अगोदरच आपल्याला सांगितलेला विचार आजही कालसुसंगत आहे.

## संदर्भसुची :

1- लोकसेवक / प्रा. अमर साहेब / प्रशांत पब्लीकेशन्स, महात्मा गांधी व नेहरू यांचे समग्र तत्वज्ञान
2- गांधी उद्यासाठी / रूपांक दिलिप कुलकर्णी / राजहंस प्रकाशन P. 579
3- Aspects of Gadhian Thought / Editor Himat Jheveri / P. 351 Mani Bhavan & Gandhi Sangrahalaya
4- महात्मा गांधी विचार विथिका/सुरेंद्र प्रसाद अग्रवाल / Concept Publishing Company / P 157
5- महात्मा गांधीचे तत्वज्ञान / डॉ. रामेश्वर भिसे / प्रशांत पब्लीकेशन्स पृ. १०७
6- Mahatma Gandhi – by Dr. Sarvapalli Radhakrushanan Jaico Publishing House P. 566
7- Gandhi M. K. (1968 – 1999) Conservative Program : Its mining and place" in the collected work of Mahatma Gandhi Vol. – 75, Ministry of information of broad casting, government of India (Originally Published in 1971)

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-11-Issue-06
November-December-2019

8- राष्ट्रीय गांधी संग्रहालय, नई दिल्ली, गांधी साहित्य सुची, नई दिल्ली १९७६

9- नैतिक धर्म / मो. क. गांधी, नवजीवन प्रकाशन पृ. ४०

10- एकविसाव्या शतकात गांधी / वासंती सोट / परंधार प्रकाशन पृ. १२०